# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१.

## जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी विशेष मोहिम

ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून बार्टीमार्फत सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना विशेष मोहिम राबविण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. मे २०१८ पासुन सतत विशेष मोहिमेअंतर्गत जवळपास सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आलेले आहेत. तसेच ज्या प्रकरणात त्रुटी आहेत त्याबाबत संबंधित विद्यार्थ्यास त्याच्या प्रकरणातील त्रुटी कळवून त्रुटीची पूर्तता करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी ज्या विद्यार्थ्यांना अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही त्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्याकडे त्रुटीपुर्तता करण्यासाठी आवश्यक पुरावे व मूळ कागदपत्रांसह त्वरीत संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक किंवा इत्यादी अडचणी उद्भवल्यास टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक - १८००२३३०४४४, whatsapp तक्रार निवारण क्रमांक : ९४०४९९९४५३ / ९४०४९९९४५२ यावर संपर्क साधावा. जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली संबंधित तांत्रिक अडचणीसाठी query-CCVIS@barti.in या ई मेलवर संपर्क साधावा. तसेच सर्व ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितींच्या संपर्क क्रमांकासाठी https://barti.maharashtra.gov.in/ECasteValidation/CCVIS या लिंक वर समिती संपर्क येथे क्लिक करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

कैलास कणसे (भापोसे)<br>
महासंचालक, बार्टी, पुणे तथा मुख्यसमन्वयक,<br>
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य

Advt/CVC/14/08/2018/31